

# -गांधीजी-

[ ओझरतें दर्शन ]

आचार्य दादा धर्माधिकारी.

किं. ४ आणे

सर्वतोमुखी क्रांतिकारक

# गांधी जी

(एक दर्शन)

आचार्य दादा धर्माधि

२ आक्टोबर १९४६

प्रकाशक—ब. गो. गर्गे.

वीणाप्रकाशन—सितावर्डी नागपूर.

मुद्रक : पु. रा. खांडवेकर,

बी. एस्‌सी , एल्. एल्. बी.

मॅनेजर- गोपाळ प्रेस, महाल - नागपूर.

# गांधीजी सर्वतोमुखी क्रांतीचे प्रवर्तक

"राजकीय चळवळींत गोडी असणाऱ्या आजकालच्या सुशिक्षित लोकांत जास्तींत जास्त प्रचलित असलेला शद्ब कोणता ?"

हा प्रश्न मीं माझ्या एका विद्यार्थी मित्राला केला. त्यानें क्षणाचाहि विलंब न लावतां उत्तर दिलें "क्रांति!" स्वत:ला क्रांतिवादी म्हणवून घेण्यांत, आपण सर्वांगीण क्रांतीचे पुजारी आहोंत, पुरस्कर्ते आहोंत असें वदवून घेण्यांत आज प्रत्येकाला धन्यता वाटते. क्रांतीच्या उद्घोषा–प्रतिघोषांनीं सारें वातावरण निनादून गेलें आहे. समाजावर आपलीच छाप पडावी, आपलेंच आधिपत्य कायम रहावें अशा हिरीरीनें परस्परविरोधी सिद्धांतांत आणि विचारप्रणालींत आज स्पर्धा सुरू झाली आहे.

म्हणून अशा स्थितींत प्रथम आपल्या समोर जर कोणता प्रश्न उभा रहात असेल तर तो हा कीं, जिच्या नांवें हजारों वक्ते चित्तवृत्ति थरारून सोडणारीं व्याख्यानें देतात व प्रचंड लोकक्षोभ निर्माण करतात ती क्रांति म्हणजे आहे तरी काय? क्रांति कशाला म्हणायचें? एक फार मोठी उलथापालथ झाली म्हणजे क्रांति झाली असें समजावयाचें कां? अशी कल्पना करूं कीं उद्यांच अकस्मात

अत्यंत प्रचंड अशी घडामोड झाली आणि तिच्यायोगें जगाचा नकाशाच बदलायची वेळ आली तर ती क्रांति झाली असें खऱ्या अर्थानें म्हणतां येईल कां ? ज्या उलथापालथीसाठीं आम्हीं जाणतेपणीं यत्नशील असतों ती क्रांति आणि वर वर्णन केलेली ही उलथापालथ ह्या दोन्ही सारख्याच समजावयाच्या कां ?

ज्या अर्थानें आज आपण क्रांति हा शब्द वापरतों त्यांत पूर्व संकल्प, व्यवस्था, आणि तन्निमित्त उपाय योजना ह्या तीन गोष्टी अभिप्रेत असतात. असें नसेल तर कोणत्याहि आकस्मिक दुर्घटनेला, निसर्गाच्या योगायोगानें झालेल्या प्रचंड घडामोडीला 'क्रांति' असें नांव आपल्याला द्यावें लागेल. सारांश, एक विशिष्ट ध्येय किंवा उद्दिष्ट ठेऊन नियत साधनांनीं आणि नियोजित पद्धतीनें प्रचलित सामाजिक स्थितींत जो बदल घडवून आणला जातो त्याला क्रांति म्हणावयाचें !

समाजांत आम्ही जें आमूलाग्र परिवर्तन करूं इच्छितों त्याच्या मुळाशीं एक निश्चित उद्देश, तदनुरूप उपाय योजनेचा एक व्यवस्थित क्रम असेल तरच तें परिवर्तन किंवा क्रांति ज्ञानयुक्त आणि श्रेयसाधक होईल. कसलेंच ध्येय-धोरण नसतां वोकाळलेला लोकक्षोभ आणि हुल्लड धूम करून उभारलेलें बंड म्हणजे परिवर्तन नव्हे. अशा दृष्टीनें विचार केला तर आज जगांत दोन प्रकारच्या शक्तींत आणि विचारप्रणालींत संघर्ष सुरू असलेला दिसून येतो. त्यांपैकीं एक प्रणाली फॅसिस्ट हुकुमशाहीची. ही प्रणाली म्हणजे स्थूल शक्तिपूजेचें अद्यतन असें संस्करणच होय. दुसरी प्रणाली

साम्यवादी मंडळींचा ! हा देखील पंथ आहे शक्तांचाच ! तथापि तो शक्तीच्या साधनांची उपासना न करतां मानवतेच्या प्रतिष्ठेसाठीं त्या शक्तीलाच आवाहन करतो. स्थूल शक्तीच्या जड उपासकांपेक्षां यांचा मार्ग जास्त श्रेयस्कर आणि उत्तम आहे हें कबूल केलें पाहिजे.

वर उल्लेखिलेल्या दोन तत्वांपैकीं फाशीवादाचा विचार येथें प्रसंगोचित होणार नाहीं. " बलं वाव विज्ञानाद् भूयोऽपिह शतं विज्ञानवतामेको बलवाना कम्पयते " ( बलाला विज्ञानाहून श्रेष्ठ समजा कारण एका शक्तिशाली व्यक्तीपुढें शंभर विज्ञानी थरथर कापतात ) या भूमिकेहून जास्त उच्च अशी ज्यांची विचारधारा किंवा संस्कृति जाऊंच शकत नाहीं त्यांच्या तत्वज्ञानाचा विचार करणें व्यर्थ आहे ! जगांतील आजचीं प्रतिष्ठा पावलेलीं मूल्यें बदलून त्यांच्या जागीं जास्त उदात्त आणि उच्चतर अशीं मूल्यें स्थापित करण्याचा संकल्प ज्यांच्या प्रयत्नाच्या मुळाशीं नाहीं त्यांच्यांत जगाला गदागदा हालवून हादरून सोडण्याचेंहि जरी सामर्थ्य असलें तरी त्यांच्या ठिकाणीं क्रांतिकारकांची लोकहितकारी शक्ति नाहीं हें निश्चित ! सबंध जगांत मानवतेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं, धनवान मनुष्य, कुलवान मनुष्य, मालकी गाजविणारा मनुष्य, शरीरबळ असणारा मनुष्य, शिपायी मनुष्य या सर्वांपेक्षां माणसाची-केवळ माणसाची-मोलमजुरी, कष्टसायास करणाऱ्या सामान्य माणसाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून साम्यवादी जो प्रयत्न करितात तोच आमच्या इच्छित क्रांतीच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त आणि विचारणीय असा आहे.

प्रचलित मूल्यें बदलवून आपल्याला ज्या क्रांतीचा पाया घालावयाचा आहे तिला उपकारक मूल्यांची प्रतिष्ठा करणें हें क्रांतीच्या तंत्राचें सर्वांत महत्वाचें असें अंग ठरतें. यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण करावयास क्रांतीचीं तत्वनिदर्शक म्हणून कांहीं प्रतीकेंहि प्रचलित करावीं लागतात आणि त्यानंतरच त्या तत्वांना अनुकूल असलेल्या साधनांची योजना करतां येतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे क्रांतीचें तत्त्वज्ञान, तद्योतक प्रतीकें आणि त्यांना अनुकूल अशीं साधनें इतक्या गोष्टी मिळून क्रांतीचें संपूर्ण शास्त्र बनत असतें.

माणसांमाणसांतील संघर्ष नाहींसे करण्याचा सर्वांत परिणाम-कारक उपाय जर कोणता असेल तर तो हा कीं संघर्षाचें मूळच नाहींसें करावयाचें. सध्याची अर्थविषमता हें आजच्या आमच्यांतील संघर्षाचें सर्वप्रमुख कारण होय यांत मतभेद नाहीं. सबब तिला नष्ट करणें प्राप्त आहे आणि तदर्थ कांहीं योजना अमलांत आणणेंही अपरिहार्य आहे. पण असले उपाय योजीत असतांना तद्वारां आमचें उद्दिष्ट कितपत साध्य होईल याचा विचार अगत्यानें झाला पाहिजे.

आज मानवसमाजांत गुणापेक्षां जन्माची, श्रमापेक्षां धनाची, उद्योगापेक्षां युद्धाची किंमत अधिक मानली जाते, त्यांची समाजांत अधिक कदर केली जाते. तिला न जुमानतां आधुनिक काळांत गुण, श्रम आणि उद्योग यांची प्रतिष्ठा वाढविण्याचा ज्या महा-

पुरुषांनीं प्रयत्न केला, त्यांत गांधी अग्रगण्य आहेत. भांडवलशाहीचा आणि लष्करशाहीचा प्रतिकार त्यांच्याच साधनांनीं करावा लागेल असेंच कित्येक नवमत पुरस्कर्ते आजहि गृहीत धरून चालतात. पण यावर गांधींचें म्हणणें असें कीं "पुंजीवादी व युद्धवादी लोकांना जिंकण्यासाठीं युद्ध हाच जर एकमात्र उपाय असेल तर मग आम्ही अगदीं मनापासून तोच पंथ स्वीकारायला हवा आणि आमचीं तत्वें चुकीचीं, दिखाऊ, निष्फळ आहेत असें नम्रपणें कबूल करून घ्यायला हवें. तत्त्वप्रस्थापना करावयाची झाली तर त्याला युद्धावाचून अन्य कोणताहि मार्ग नाहीं, तेंच एकमेव साधन आहे हेंच तर युद्धवादी लोकांच्या धर्माचें आद्यसूत्र आहे. तेंच जर आपल्याला कबूल करून घ्यायचें असेल तर आमचें असें वैशिष्ट्य राहिलें तरी कोठें ? कारण मग त्यांच्या आणि आमच्या मार्गांत आणि ध्येयांत मुळीं फरकच रहात नाहीं. सबब मग त्यांनाच शरण जाणें श्रेयस्कर !"

हीं कसोटी लावल्यास इतर नवमत पुरस्कर्ते साधनांच्या योजनेंत क्रांतिकारक ठरलेले नाहींत हें उघड आहे. उलट ते कांहीं अंशीं सनातनीच आहेत. त्यांची योजना नवी आहे, त्यांचा कार्यक्रम अभिनव आहे, प्रतिक्रियाहि अपूर्व अशी आहे पण त्यांचीं साधनें मात्र तींच जुनीं परंपरागत आहेत ! कधीं कधीं तर असेंहि वाटतें कीं त्यांचा नवमतवाद हा जीर्णमतवादाचाच एक नवा पैलू आहे—जणुं जीर्णमतवादालाच जरा उलटें करून रंगसफेदीनें त्यांचा रूपरंग झकास नवा दिसेल असा करून दिला, झालें !

गांधींचे कांहीं विचार आणि मार्ग दिसायला जरी कधीं कधीं सनातनी छापाचे दिसले तरी सर्वतोमुखी क्रांतीचा त्यांच्यासारखा प्रणेता आणि पुरस्कर्ता आज तरी दुसरा झाला नाहीं. सर्वोदय किंवा सर्वहित हें गांधींचें साध्य आहे. त्यांच्या धर्माचें प्रथम सूत्र बंधुत्व हें आहे. त्यांच्या रामराज्याचे नियामक सिद्धांत स्वातंत्र्य आणि समता हे आहेत आणि युद्धें नष्ट करण्याचा त्यांनीं विडा उचलला आहे. हा आपला पण तडीस नेण्यासाठीं त्यांनीं ज्या उपायांची योजना आणि प्रयोग केले आहेत तेहि अपूर्व असे आहेत. अहिंसक प्रतिकाराच्या शास्त्राचे आणि विधींचे प्रवर्तक असलेले गांधी शांतिधर्माचे एकनिष्ठ अनुष्ठाते आहेत.

माणसाची प्रतिष्ठा कायम करावयासाठीं त्यांनीं हरिजन सेवेचा उपक्रम केला. श्रमाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं त्यांनीं आपल्या आवश्यक +एकादशव्रतांत शरीरश्रमाचा समावेश केला आणि लष्करशाही नष्ट करण्याच्या हेतूनें एका अभिनव उदात्त आणि बंधुभाववर्धक युद्धपद्धतीचें आविष्करण आणि संशोधन केलें. ज्या पुण्यश्लोक युगप्रवर्तकांनीं जगाला एक क्रांतिकारक ध्येय दिलें

---

**+ त्यांचीं आवश्यक एकादश व्रतें—**

**अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।**
**शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन ॥**
**सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।**
**ही एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥**

**—विनोबा**

त्यांचें कार्य गांधींनीं पुरें केलें आहे. गांधींनाहि थोडा विध्वंस करावाच लागला; नाहीं असें नाहीं. पण या विध्वंसाचें स्वरूप जुनाट पडक्या खिडारांच्या भिंती पाडून नव्या मंदिराचा पाया घालण्यासारखें आहे. दुसऱ्यांच्या तत्वांचें खंडन करणें हें गांधींच्या कार्याचें स्वरूप नसून त्या तत्वांतील 'न्यून तें पुरतें' करून घेण्यांत त्यांच्या कार्याची पूर्ति आहे. भावी इतिहास त्यांच्याबद्दल असाच निर्णय देईल कीं मोडतोड करण्यासाठीं त्यांचें जीवन नव्हतें; 'वरी कवणें एकें उपायें पडिलें तें उभें होये' हाच त्यांचा जीवनहेतू होता.

"He came not to destroy but to fulfil." साम्यवाद्यांच्या क्रांतिकारक ध्येयामध्यें क्रांतिकारक साधनें आणि प्रतीकें पुरवून गांधींनीं त्यांचें "दर्शन" अधिक शास्त्रपूत, तर्कशुद्ध आणि कार्यक्षम असें बनविलें.

शांतिमय संग्रामाची अपूर्व कल्पना आणि पद्धतीचा आविष्कार आणि प्रयोग करणारे गांधी हे आजच्या दुनियेंतील सर्वश्रेष्ठ असे शांतिदूतच केवळ नव्हत तर सर्वांगीण क्रांतीचे ते अग्रदूतहि आहेत आणि म्हणून त्यांनींच स्वत:विषयीं खालील प्रकारचे जे उद्गार काढले ते अगदीं यथार्थ आहेत:— *

---

* "Some people have called me the greatest revolutionary of my time. It may be false but I believe myself to be a revolutionary—a nonviolent revolutionary—they say 'means are after all means.' I would say 'means are after all everything.' As the means so the ends...Realisation of the goal is in exact proportion to that of the means. This is a proposition that admits of no exception."

"मी माझ्या जमान्याचा सर्वांत मोठा असा क्रांतिकारक आहे असें कांहीं मानतात. हें चूकहि असूं शकेल, पण मी स्वतःला एक क्रांतिकारक—शांतिपरायण क्रांतिकारक—तर समजतोंच. 'साधनें हीं कितीहि झालें तरी अखेर साधनेंच.' असें म्हटलें जातें. पण यावर मला मात्र असें म्हणावयाचें आहे कीं साधनांतच परिणामीं सर्व कांहीं सांठविलें आहे. जसें साधन तसें साध्य. साध्य व साधन यांत अभेद्य अशी भित मुळींच नाहीं. ज्या मानानें साधनांचें अनुष्ठान होईल त्या मानानें ध्येयसिद्धि होईल हें निरपवाद आहे." — ऑक्टोबर १९४०

# गांधीजी भारतीय जीवनाचे प्रयोगी प्रतिनिधी

जीवनामध्ये सुद्धां भारतीय आणि अ–भारतीय असे भेद करावयाचे ? माणूस सर्वत्र एकच ना ? मग जीवनांत भेद कां ? त्यांत ऐक्य कां असूं नये ?

असूं कां नये ? मनुष्य सर्वत्र एकच आहे. जीवनहि एकच आहे. तथापि जीवनाच्या बाह्य स्वरूपांत, जीवन–प्रणालींत दृष्टींत, रहाणींत, देशकाल परिस्थिति परत्वें जी भिन्नता येते ती त्या त्या देशाचें विशेष जीवन म्हणून गणली जाते. आपलें भारतीयांचें एक वेगळें जीवनदर्शन आहे तें याच अर्थानें ! त्याच्या अनुरोधानेंच या देशानें आपलें समाज संनिधान, आणि सामाजिक आदर्श निर्माण केले आहेत. या भारतीय जीवनांत गांधींचें स्थान आणि त्यांची कृति अद्‌भूतच नव्हे तर अद्वितीय, अपूर्व अशी आहे.

भारतीय जीवनांत जीव उरला नव्हता, त्यांत गांधींनीं चैतन्य आणलें. भारतीय जीवन निष्प्रभ झालें होतें, तें गांधींनीं तेजोमय केले. भारतीय जीवन विरूप, विसंगत झालें होतें. गांधींनीं

त्यांत शोभेचा, सौंदर्याचा, संगतीचा आविष्कार केला: गांधींचा भारतीय जीवनाशी संबंध काय? असें कुणी विचारलें तर त्याला उत्तर असें देता येईल कीं, त्यांनी निर्जीव जीवन सजीव केलें, गतप्राण समाजाला संजीवन दिलें!

हा भारत देश ऋषिमुनींचा होता, बुद्ध भिक्षूंचाहि होता; हिंदुसम्राटांचा आणि मुसलमान बादशहांचाहि होता. पण ज्या भारताची गांधीजी पुनर्निमिती करूं इच्छितात तो या सर्वाहून अगदीं वेगळा आहे. त्या नव-भारताची मूस अजून पुरती ओतली गेली नाहीं. त्याला निश्चित सगुण रूप आणण्याची क्रिया अजून सुरूच आहे.

गांधी महात्मा आहेत कीं मुत्सद्दी? योगी आहेत कीं, राष्ट्रनेते? तत्त्वज्ञ आहेत कीं वैज्ञानिक? क्रांतिकारक की उत्क्रांतिवादी? असल्या प्रकारचे प्रश्न पुष्कळांसमोर उभे रहातात. या सर्वांची चर्चा येथें कर्तव्य नाहीं. गांधीजी योगी आहेत!— ते अशा अर्थानें कीं त्यांची माणसाच्या अंतरात्म्यावर अढळ अचल निष्ठा आहे. मानवाच्या अंतरात्म्यांत ते अनंत शक्तीचें निधान पहातात. तथापि आत्मनिष्ठ योगी असूनहि ते वस्तुविमुख किंवा समाज-पराङ्मुख नाहींत. त्यांचा आत्मयोग वस्तुनिष्ठ आहे. आणि या अर्थानें घेतल्यास ते वैज्ञानिकहि आहेत. पण त्यांचें सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य हें कीं ते प्रयोगी आहेत आणि भारतीय जीवनाचीं सनातन त्रिकालाबाधित तत्त्वें ते वर्तमान परिस्थितींत योजू

इच्छितात व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न सतत अविरत चालत आले आहेत !

भारतीय जीवन दर्शनाचीं दोन आधारभूत तत्वें आहेत. एक अद्वैत आणि दुसरें समन्वय ! त्यापैकीं अद्वैत हें त्या जीवनाचें निषेधक आणि समन्वय हें विधायक रूप होय. या दोन तत्त्वांची समाजांत प्रस्थापना व्हावी म्हणूनच जगांतील सारे क्रांतिकारक प्रयत्न करीत आले आहेत. नुसतेंच जगत रहाणें हा मानवाचा जीवनोद्देश नव्हे; त्याला एक दुसऱ्याशी मिळून मिसळून संमीलित जीवनाचा योग साधावयाचा आहे. हें संमीलित जीवन अद्वैत आणि समन्वयाच्या साधनांनींच साध्य होऊं शकतें.

या जगांत आजवर समन्वय व अविरोध या विशिष्ठ मानवी तत्त्वांचा अवलंब यथेष्ठपणे केवळ कुटुंबक्षेत्रांतच केला गेला. संस्कृत किंवा असंस्कृत यांपैकीं कोणत्याहि कुटुंबाचें उदाहरण घेतलें तरी त्याला आधारभूत असलेलीं अशीं वरील दोनच तत्त्वें आढळून येतात. गांधीजींनीं त्यांचा व्यापक प्रमाणावर प्रयोग करून तीं तत्त्वें समाजव्यापी करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयोग अद्वितीय आणि अभूतपूर्व असा आहे. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आणि अडचणी ज्या हरघडी उभ्या राहिल्यासारख्या वाटतात त्या याचमुळें !

या प्रयोगाच क्षेत्र वाढवितांना सर्वांत पहिली अडचण अशी की समाजाच्या सर्व क्षेत्रांतून जर हा कौटुंबिक न्याय लागू

करावयाचा झाला तर अन्याय आणि अत्याचार यांचा प्रतिकार कसा करावयाचा ? क्षमाशीलता, सहनशीलता ही सभ्य, संस्कारी कुटुंबाची खूण समजली जाते. या गुणामुळेंच त्या कुलाला " कुलीन " असें संबोधिलें जातें. याउलट ज्यांच्यांत रोज भांडण-तंटे, शब्दाशब्दी, झोंबाझोंबी चालते व त्यांतच जे सार्थक मानतांत त्यांना आपण अकुलीन, असभ्य म्हणतों. हाच न्याय जेव्हां राजकीय किंवा धार्मिक कलहाच्या बाबतींत गांधीजी लागू करूं इच्छितात तेव्हां प्रतिकार व विरोध यांना मुळीं जागाच उरत नाहीं. भारतीय जीवनांतील समन्वयाच्या आदर्शाला प्रत्यक्षांत आणूं इच्छिणाऱ्या प्रयोगी गांधींचें याबाबत असें उत्तर आहे कीं " कौटुंबिकता, कुलीनता, पारिवारिक संस्कारिता आणि प्रतिरोध किंवा प्रतिकार यामध्यें विशेष असा विरोध नाहीं. त्यांच्यांत मूलभूत सामंजस्य आहे. त्याचें संशोधन व आविष्कार करण्यांतच आमच्या समाजक्रांतीचें साफल्य आहे. " गांधींची निष्ठा आणि आग्रह समन्वयासाठीं असल्याकारणानें त्यांच्या जीवनदर्शनाला ' विश्वकुटुंबवाद ' म्हणण्यापेक्षां " विश्वकुटुंब योग " म्हणणें अधिक अन्वर्थक ठरेल. या योगाला अनुरूप अशा प्रतिकारशास्त्राचें संशोधन आणि प्रतिकार कलेचा विकास ही गांधीजींनीं मानव-जातीला दिलेली खास देण होय ! यापेक्षा दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें भारतीय जीवनाची व्यापकता आणि भव्यता वाढविणें शक्य झालें नसतें.

तथापि कांहीं दशकांपासून किंवा शतकांपासून म्हणा भारतीय जीवनाला अवकळा आली होती. सर्व तऱ्हेनें तें बेढब, विकृत बनलें होतें. कुलीनतेची जागा निष्क्रीयतेनें घेतलेली, सहनशीलतेची परिणति अप्रतिकारांत झालेली, भित्रेपणालाच क्षमाशीलतेचें श्रेय मिळत असलेलें, कुठेंहि दृष्टिक्षेप केला तरी सर्वत्र निराशा, हतबुद्धता, दुर्बलता यावाचून कांहीं नाहीं— अशी स्थिति होऊन गेली होती. अशा या अवनत, अधःपतित जीवनाची पुनः समन्वय आणि अद्वैताच्या तत्त्वावर उभारणी करावयाची होती. हें कार्य गांधीजींनीं जसें केलें तसें इतर कुणीहि केलें नाहीं. नखशिखान्त शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या साम्राज्य सत्तेचा भारतीय जनतेनें केलेला प्रतिकार, त्या सत्तेशी दिलेली टक्कर, केलेला संगर, हा मानवजातीच्या इतिहासाचा एक अद्भुतरम्य, रोमहर्षण असा अध्याय होय ! त्यांत वीरतेची पराकाष्ठा असून सभ्यतेची मर्यादाहि आहे. माणूस प्रतिकूल विषम परिस्थितीशी टक्कर द्यायला तयार होतो हें वीरतेचें लक्षण होय, आणि विरोध व प्रतिकाराच्या वेळीं देखील शत्रुता, वैरभाव यांपासून तो अलिप्त रहाण्याचा प्रयत्न करतो ही सभ्यतेची मर्यादा होय ! गांधीजींची प्रतिकारनीति या दोन्ही कसोट्यांवर पूर्णपणें उतरते.

भारतीय जीवनांत शिरलेला दुसरा दोष म्हणजे धर्मविग्रहाची आणि जातिविग्रहाची भावना. सांस्कृतिक व भाषिक विग्रह हेहि त्यांत येऊन मिळाले. या क्षेत्रांत देखील विरोधाचा परिहार करून सामंजस्य साधण्याचा अविराम प्रयत्न गांधीजींनीं केलेला आहे. सर्वधर्मांचें ऐक्य प्रत्यक्षांत आणण्याचें साधन म्हणून

त्यांनीं "सर्वधर्मसमभावा" चा पुरस्कार केला, सांस्कृतिक विग्रहावर तोडगा म्हणून संस्कृतीच्या मूलभूत ऐक्यावर जोर दिला आणि भाषावादाचें निराकरण व्हावें म्हणून भाषेच्या आणि लिपीच्या क्षेत्रांत संयुक्त जीवनाच्या संयुक्त भाषेची चळवळ सुरू केली. जातीय किंवा हिंदु-मुस्लीम ऐक्य साधण्याचे जे प्रयोग त्यांनीं राजकीय क्षेत्रांत केले तेहि धर्मसमन्वय आणि सांस्कृतिक सामंजस्य या उभय सिद्धान्ताच्या आधारावरच !

जातिभेदाची भावना नष्ट करण्याचा प्रयत्न देखील जो त्यांनीं केला तो अगदी निश्चयात्मक भावनेनें. जन्मजात उच्च-नीचता हा जातिभेदाचा मूळ आधार आहे. हेंच दुसऱ्या शद्बांत सांगावयाचें म्हणजे रक्ताची श्रेष्ठता सिद्ध करण्याची ही भावना आहे. अस्पृश्यतेचा कलंक नाहींसा करावयास त्यांनीं स्पर्शभावना पुरस्कारिली, ती आचरणांत आणली व या प्रयोगानें त्यांनीं भेदाच्या भावनेवरच मुळीं घाव घातला. जानव्याला, तरवारीला, तिजोरीला जी प्रतिष्ठा होती तीच प्रतिष्ठा त्यांनी भंग्याच्या "झाडूला" प्राप्त करून देण्याचा अव्याहत प्रयत्न केला. आणि अशा रीतीनें भारतीय जीवनांत दृढमूल झालेले धर्मविग्रह, जातिविग्रह आदि दोष अगदीं पाळंमुळांसकट खणून काढण्याची विधायक साधना केली.

ज्यांना त्यांच्या आश्रमांत प्रवेश मिळतो त्यांच्या कडून प्रथम ते पायखाने स्वच्छ करण्याचें काम करवून घेतात आणि त्यायोगें त्यांच्या मनावर सांचलेली कुलाभिमानाची व वर्णाभिमानाची सारी धूळ अशा रीतीनें झाडून टाकतात. धर्मराजानें राजसूय

यज्ञाच्या वेळीं सुयोग्य माणसांना जेव्हा त्यांच्या त्यांच्या योग्यते-प्रमाणे कामें वाटून दिलीं तेव्हा अग्रपूजेचा मान मिळालेल्या श्रीकृष्णाला सर्वांचें पादप्रक्षालन आणि उष्ट्या पत्रावळी उचलण्याचें काम दिलें. आमच्या राष्ट्रव्यापी भेद निवारण यज्ञामध्यें हेंच कार्य गांधीजी अधिक व्यापक आणि उन्नत भूमिकेवर करीत आहेत.

त्यांचें आणखी एक सांगणें आहे. आश्रमांत प्रवेश मिळालेल्या सुशिक्षितास गांधीजी विचारतात–"तुम्हांला स्वयंपाक करतां येतो?" हा प्रश्न ऐकतांच नवागत अगदी बुचकळ्यांत पडतो. त्याला वाटते कीं देशसेवा, आत्मोन्नति आणि स्वयंपाक यांचा संबंध काय? इथे पुन: मला राजसूय यज्ञांतीलच दृष्टांत आठवतो. त्यावेळीं स्वयंपाकाची व्यवस्था कुणाकडे सोंपवावी असा जेव्हा धर्माला प्रश्न पडला तेव्हा तें काम बलवान भीमसेनाला दिलें गेलें. पांच पांडवांत युद्धकला आणि शस्त्रकलानिपुण असा अर्जुन होता. पण बलिष्ठ म्हणून वृकोदराचेंच नांव होतें. भीमाची शक्ति शस्त्रावलंबित किंवा कौशल्यावर आधारलेली नव्हती. शरीररक्षण एकतर प्रतिकारानें होतें व दुसरें आहारानें. प्रतिकार हें नैमित्तिक व आहार हें नित्य रक्षणाचें साधन आहे. धर्मानें जो विचार केला तो असा कीं जो स्वत:ला पराक्रमी म्हणून संबोधितो त्याला प्रतिकाराप्रमाणे आहार–विधेंत देखील सिद्धहस्त असणें अगत्य आहे. गांधीजी देखील हेंच सुचवूं इच्छितात.

शिवाय यांत आणखीहि एक हेतु दडलेला आहे. सर्व-साधारणपणें लोकांची अशी भावना असते कीं स्त्रियांनीं स्वयंपाकाचें

कर्तव्य करावें आणि पुरुषानें तरवार गाजवावी व पैसा मिळवावा. या विषम भावनेचेंहि गांधीजी निराकरण करूं इच्छितात. त्यांचें याबाबत असें म्हणणें आहे कीं जोंवर स्त्री व पुरुष यांच्या जीवनाच्या भूमिका समान होणार नाहींत, जोंवर एक गौण आणि दुसरा प्रमुख अशी स्थिति राहील तोंवर स्त्रियांच्या नागरिकतेचें स्वरूप लटकेंच राहील. एक अलंकार, एक आभूषण—असेंच तें स्वरूप असेल. तें अधिक सजीव जीवनव्यापी बनविण्यासाठीं स्त्रियांना पुरुषांच्या पातळीवर आणायला हवें. स्त्रिया आपल्या नागरिक हक्कांचा उपभोग घेऊं शकतील आणि नागरिक कर्तव्याची पूर्ति पुरुषांप्रमाणें आणि तीहि त्यांच्या खांद्याला खांदा लावून करूं शकतील अशी परिस्थिति निर्माण करावयाला हवी. समाजांत पुरुषांबरोबर स्त्रियांना निर्भयपणें वावरतां आलें पाहिजे. यासाठींच गांधीजींनीं स्त्री-पुरुषांच्या योग्यतेच्या समानतेबरोबरच समाजांत संयम किंवा ब्रह्मचर्य वृत्तीची आवश्यकता प्रतिपादन केली. त्या योगेंच स्त्रियांचें नागरिक सह-जीवन सफल होईल. सामाजिक क्रांतीच्या इतिहासांत त्यांचा हा प्रयोग नुसता अपूर्वच नव्हे; तर मोठा धडाडीचा, पराक्रमपूर्ण असा आहे.

धर्मवाद, भाषावाद, जातिवाद इ. वादांनीं शतधा नि सहस्रधा विदीर्ण झालेल्या समाजांत वर्गविग्रह अपरिहार्य आहे. उत्पादक शरीरश्रमाची अप्रतिष्ठा आणि त्याबद्दलची अरुचि हा वर्गविग्रहाचा आधार होय. गांधींनीं या मुळावरच कुठाराघात करण्याचें योजिलें. उत्पादक शरीरश्रमाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं

चरख्याला अर्थक्रांतीचें साधन बनविलें. आरंभी आरंभी त्यांनीं वर्गसमन्वयाचा प्रयत्न करून पाहिला; पण वर्गभेदाचें निर्मूलन केल्यानेंच आर्थिक संविभागाची स्थापना होऊं शकेल हें लवकरच त्यांना कळून चुकलें. तेव्हांपासून दरिद्रीनारायणाच्या उपासनेचें साधन म्हणून त्यांनीं उचललेला चरखा आज शेतकरी, श्रमिक, किसान-मजदूर राज्यस्थापनेचें प्रतीक होऊन बसला आहे. दोन तत्त्वांमध्यें केवळ बाह्य विरोधच असतो तेव्हां त्यांतून समन्वय साधणें शक्य होतें. पण धनसत्ता आणि श्रमसत्ता यांत तम: प्रकाशवत् विरोध आहे. म्हणून वर्गसमन्वयाच्या सिद्धांताची परिणति आज किसान-मजदूर प्रजाराज्याच्या सिद्धांतांत झालेली आहे.

भारतीय जीवनाशी गांधीजी एकरूप झालेले आहेत. या भारतीय जनतेच्या जीवनाशी गांधीजी तादात्म्य पावले आहेत. जनतेच्या सुखदु:खांत ते आपलें सुखदु:ख पहातात. भारतीय जनतेला ते आपलें उपास्य दैवत मानतात. तिची कुवत, तिचे दोष, तिच्या उणीवा ते जाणतात. पण त्या उणीवांच्या आड दडलेल्या अनंत शक्तीचा, सामर्थ्याचा, गुणांचा त्यांना साक्षात्कार होतो आणि याचमुळें ते लोकजीवनांत आशा, सामर्थ्य, प्रयोगवीरता अंकुरित करूं शकतात.

गांधीजींच्या या जनतेवरील श्रद्धेचें, लोकनिष्ठेचें रहस्य काय ? असा जेव्हा मला प्रश्न विचारला जातो तेव्हा मी म्हणत असतों कीं, गांधी माणूस आहेत. ते तत्वज्ञ नाहीत, शास्त्रज्ञ नाहींत, राजनीति निपुण नाहींत किंवा समाज शास्त्राचे प्रकांड

पंडित नाहींत. ते नुसते ' माणूस ' आहेत— निखळ शुद्ध माणूस ! मी जोर देतों तो ' माणूस ' या शद्बांवर ! ते पशु नाहींत आणि देव पण नाहींत. म्हणूनच ते भारतीय जनतेचे अपूर्व असे प्रतिनिधि आहेत. त्या जनतेला ते सांगतात– " तुम्ही देव बनूं नका आणि पशुत्वा पासून दूर व्हां, उन्नत व्हा. " देवत्वा पासून त्यांना ते वाचवूं इच्छितात आणि पशुत्वापासून त्यांचा उद्धार करून त्यांना मानवोचित जीवनाचे अधिकारी बनवूं इच्छितात. भारतीय जनमन त्यांनीं ओळखलें, आपलेंसें करून घेतलें आहे. भारतीय आणि एकूण मानवी संस्कृतीच्या त्रिकालाबाधित सार्वभौम तत्त्वांचे ते प्रयोगी प्रतिनिधि आहेत.

सांस्कृतिक प्रगतीचें साध्य काय ? साधन कोणतें ? संवादित्व कीं संघर्ष ? आक्रमण कीं सहयोग ? मानवहृदय ग्वाही देऊन सांगते— " संवादित्व, सहयोग ! " भारतीय जनहृदय म्हणतें- " अहो, हेंच आमचें अद्वैत, हाच तो आमचा समन्वय ! आमचें अमूल्य पितृधन तें हेंच ! " गांधीजी म्हणतात— " असें आहे नां ? तर मग या. त्याच शाश्वत तत्त्वांचा प्रयोग भारतीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत करूं या आणि कुरुक्षेत्राचें धर्मक्षेत्र बनवून आपल्या देशाला आपण जगाची वाराणशी— अगदी खऱ्या अर्थानें पुण्यक्षेत्र बनवून टाकूं या. " —वर्धा ३-१०-१९४५.

## नवीन प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| * वीररत्नमंजूषा | सावरकर | २ रु. |
| * आघात | ब्रम्हे | १॥ रु. |
| * ध्येयाचा ध्यास | वरखेडकर | १॥ रु. |
| * क्रांतिप्रवण तरुण | आचार्य धर्माधिकारी | ४ आ. |
| * पाथेय | चोरघडे | २॥ रु. |
| * मनमोर | शांताराम | २॥ रु. |

**वीणा प्रकाशन—नागपूर.**

कव्हर छपाई—नक्षत्र प्रेस, नागपूर.